## संक्षिप्त

### ग्रामविकास संस्थेस लीडरशिप पुरस्कार

**औरंगाबाद :** दुष्काळ निवारण्याचे पथदर्शी काम केल्याबद्दल ग्रामविकास संस्थेस देवांग मेहता फाउंडेशन मुंबईतर्फे बुधवारी (ता. २९) एनजीओ लीडरशिप पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. गरवारे कंपनीचे अध्यक्ष डॉ. विहार राखुंडे यांच्या हस्ते ग्रामविकासचे सचिव नरहरी शिवपुरे यांनी हा पुरस्कार स्वीकारला.

### सोमठाणा प्रकल्पात जेमतेम पाणीसाठा

**बदनापूर :** शहरासह जवळपास १५ गावांची तहान भागविणाऱ्या सोमठाणा प्रकल्पात १०.२० टक्केच पाणीसाठा आहे. या प्रकल्पासह वाल्हा तसेच राजेवाडी साठवण तलावातही यंदा २० ते २५ टक्केच पाणीसाठा झाला आहे. आन्वी येथील तलावात बऱ्यापैकी पाणीसाठा झाला. त्याला ऑगस्टमध्ये झालेला पाऊस कारणीभूत ठरला आहे. पोळ्याआधीच तालुक्यात पाऊस भोळा झाल्याची स्थिती आहे.

### ४८ हजार कुटुंबांना गॅसजोडणी

**जालना :** केंद्र सरकारच्या प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेअंतर्गत जालना जिल्ह्यात दीड वर्षात ४८ हजार ४२२ कुटुंबांना घरगुती गॅसजोडणी देण्यात आली आहे. देशात २०१९ पर्यंत ५ कोटी कुटुंबांना घरगुती गॅसजोडणी देण्यात येणार आहे. यामध्ये जालना जिल्ह्यासाठी १ लाख १७ हजार कुटुंबांना उद्दिष्ट देण्यात आले आहेत. पात्र कुटुंबाने जवळच्या गॅस एजंसीकडे अर्ज केल्यास कुटुंबाची पात्रता तपासून योजनेच्या लाभासाठी कार्यवाही केली जाणार आहे.

# मोसंबी फळगळीबाबत तज्ज्ञ बांधावर

## भरपाईसाठी शेतकऱ्यांचे निवेदन; आणखीही काही भागांत केली जाणार पाहणी

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** मराठवाड्यातील मोसंबीच्या संकटात सापडलेल्या आंबे बहाराची वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठाचे तज्ज्ञ व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी बुधवारी (ता. २९) पैठण तालुक्यात पाहणी केली. या पाहणीत तज्ज्ञांनी फळगळीच्या कारणांचा शोध घेतला असता विविध कारणे पुढे आली. त्यावर उपायही सुचविले गेले. कारणांच्या स्पष्टतेसाठी आणखी काही भागात प्रत्यक्ष बागेत जावून पाहणी केली जाणार आहे. या पाहणीदरम्यान मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांनी तालुका कृषी अधिकाऱ्यांना शासनाकडून मदत देण्याची मागणी करणारे निवेदन सादर केले.

मराठवाड्यातील मोसंबीचे पीक सर्वात महत्त्वाचे. या फळपिकाच्या आंबे बहारावर यंदा फळगळीचं मोठ संकट ओढवलं आहे. गतवर्षीपर्यंत पाच ते दहा टक्क्यांपर्यंत असणारी ही फळगळ यंदाच्या आंबे बहारात २० ते ५० टक्क्यांपर्यंत पोहचली आहे. 'अॅग्रोवन'ने बुधवारी (ता. २९) मोसंबीच्या आंबे बहाराच्या परिस्थितीसह शेतकऱ्यांच्या मागणीविषयीचे वृत्त प्राधान्याने प्रकाशित केले. त्या वृत्ताची दखल घेत संकटात सापडलेल्या मोसंबी उत्पादकांना उपाय सुचविण्यासाठी बुधवारीच मोसंबी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. एम. बी. पाटील, राष्ट्रीय कृषी संशोधन केंद्राचे प्रमुख डॉ. एस. बी. पवार, वनस्पती रोग शास्त्रज्ञ डॉ. गजेंद्र जगताप, कृषी विस्तार शिक्षण केंद्राचे रामेश्वर ठोंबरे, तालुका कृषी अधिकारी भाऊसाहेब पायघन, मंडळ कृषी अधिकारी रामनाथ कारले, वसंतराव कातबने, संदीप जवने आदींनी पैठण तालुक्यातील मोसंबी उत्पादकांच्या बांधावर जावून मोसंबीच्या अवस्थेची पाहणी केली. या पाहणीदरम्यान लोहगाव येथे शेतकरी विजय रेंधे यांच्यासह अनेक शेतकऱ्यांनी फळगळ झालेल्या शेतकऱ्यांनी झालेल्या नुकसानीप्रकरणी शासनाने मदत देण्याची मागणी केली.



### फळगळीची तज्ज्ञांच्या निदर्शनास आलेली कारणे

- संतुलित खत वापराचा अभाव
- लागवडीचे अंतर शिफारशीनुसार नसणे
- माती परीक्षणावर भर नसणे
- पावसाच्या खंडाचाही परिणाम
- हवामानातील बदलाचा परिणाम
- गरजेपेक्षा जास्त मोकळे पाणी देणे
- ठिबकनेही पाणी देण्यासाठी सदोष पद्धतीचा वापर

## नांदेड, परभणी, हिंगोलीतील २० बाजार समित्यांमध्ये भुसार मालाची खरेदी बंद

**नांदेड (प्रतिनिधी) :** नांदेड, परभणी, हिंगोली जिल्ह्यांतील ३६ पैकी २० कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये भुसार मालाच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार शुक्रवारी (ता. ३१)देखील बंद होते.

आधारभूत किंमत दरापेक्षा कमी दराने खरेदी करणाऱ्या व्यापाऱ्यांना दंड, तसेच कैदेची शिक्षा ठोठावण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे या तीन्ही जिल्ह्यांतील अडत व्यापाऱ्यांनी भुसार शेतीमालाची खरेदी बंद केली आहे. शुक्रवारी (ता. ३१) नांदेड जिल्ह्यातील १९ पैकी नांदेड, धर्माबाद, देगलूर, लोहा, उमरी, भोकर या बाजार समित्यांतील व्यवहार बंद होते. परभणी जिल्ह्यातील ११ पैकी ताडकळस वगळता अन्य दहा बाजार समित्यांमध्ये भुसार मालाची खरेदी बंद होती. हिंगोली जिल्ह्यातील हिंगोली, कळमनुरी, सेनगाव, जवळा बाजार या चार बाजार समित्यांमध्ये खरेदी बंद होती.

## ...अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयावर रेडा मोर्चा काढणार : स्वाभिमानी

**परभणी (प्रतिनिधी):** जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या मूग आणि सोयाबीनची हमीभावाने खरेदी करण्यासाठी तत्काळ शासकीय खरेदी केंद्र सुरू करण्यात यावे, अन्यथा जिल्हाधिकारी कार्यालयावर रेडा मोर्चा काढू, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेतर्फे जिल्हा प्रशासनाला दिला आहे.

शिक्षेची कारवाई करण्याचा निर्णय घेण्यात आल्यामुळे व्यापाऱ्यांनी शेतमालाची खरेदी बंद केली आहे. दुसरीकडे शासकीय हमीभाव केंद्र सुरू करण्यात आलेले नाही. यामुळे शेतकरी चिंतेत आहेत. शासनाच्या चुकीच्या धोरणाचा फटका शेतकऱ्यांना बसत आहे. आधीच बोंडअळीचे संकट त्यात शेतमालाची खरेदी बंद झाल्यामुळे शेतकरी मानसिक, अडचणीत सापडले आहेत. त्यामुळे शासकीय खरेदी केंद्र सुरू करण्यासाठी आदेशीत करून तत्काळ केंद्र कार्यान्वित करण्यात यावेत, अन्यथा मोर्चा काढण्यात येईल, असा इशारा स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष किशोर ढगे, रामाभाऊ आवरगंड, भास्कर खटींग, केशवर आरमळ, राजू शिंदे आदींनी दिला आहे.

सकाळ अॅग्रोवन
आयोजित
फ्लेक्सो टफ
गुडविल पॉलीप्लास्ट, लातूर
प्रायोजित
सकाळ अॅग्रोवन संवाद
**'अॅग्रोवन' साधणार शेतकऱ्यांशी संवाद**
**कार्यक्रम वेळापत्रक**
**रविवार, २ सप्टेंबर २०१८ रोजी**
**विषय –** सोयाबीन व ऊस व्यवस्थापन
**वक्ते – डॉ. वसंत पी. सूर्यवंशी**
(विस्तार कृषी विद्यावेत्ता, विभागीय कृषी विस्तार शिक्षण केंद्र, लातूर)
**प्रा. संदीप बी. देशमुख** (विशेष शास्त्रज्ञ, मांजरा, केव्हीके, लातूर)
**श्री. सुनिलकुमार उपाध्याय** (सीएमडी, गुडविल पॉलिप्लास्ट)
**श्री. शिलरत्न शिरसाठ** (प्रतिनिधी, गुडविल पॉलिप्लास्ट)
**स्थळ –** जनता विद्यालयाजवळ, हनुमान मंदिर, पोहरेगाव, ता. रेणापूर, जि. लातूर, **वेळ –** सकाळी ८.३० वा.
**या मार्गदर्शन मेळाव्याचा आपण व आपल्या शेतकरी मित्रांनी अवश्य लाभ घ्यावा, ही विनंती.**

# मराठवाड्यातील प्रकल्पांत उपयुक्त साठा ३१ टक्क्यांवर

**औरंगाबाद (प्रतिनिधी) :** मराठवाड्यातील ८६७ प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठा ३१ टक्क्यांवर पोचला आहे. गत आठवडाभरात जवळपास अकरा टक्क्यांची वाढ झाली आहे. १७ ऑगस्टपर्यंत २० टक्क्यांवर असलेला प्रकल्पांमधील उपयुक्त पाणीसाठा ३१ टक्क्यांवर पोचला आहे.

मराठवाड्यातील ११ मोठ्या प्रकल्पांत ३१ ऑगस्टपर्यंत उपयुक्त पाणीसाठा ३४.९९ टक्क्यांवर पोचला आहे. औरंगाबाद जिल्ह्यातील जायकवाडी प्रकल्पातील पाणीसाठा ४७.४० टक्क्यांवर पोचला आहे. त्यामध्ये उपयुक्त पाणीसाठा १०२९.०५४ दलघमीवर पोचला आहे. उस्मानाबाद जिल्ह्यातील सिनाकोळेगाव प्रकल्पात अजूनही उपयुक्त पाणीसाठा झालाच नाही. नांदेड जिल्ह्यातील विष्णुपुरी प्रकल्प ९४ टक्क्यांवर पोचला आहे. उर्ध्व पेनगंगा प्रकल्प ६३ टक्के, निम्न तेरणा प्रकल्प ४० टक्के, निम्न दुधना २६ टक्के, सिद्धेश्वर २० टक्के, माजरा ४ टक्के, तर येलदरी प्रकल्पात ७ टक्के उपयुक्त पाणीसाठा झाला आहे.

मराठवाड्यातील ७४६ लघू प्रकल्पांतील उपयुक्त पाणीसाठा ३१ ऑगस्टपर्यंत किंचित घटून १९.८३ टक्क्यांवर आला आहे. गत आठवड्यात लघू प्रकल्पातील उपयुक्त पाणीसाठा २० टक्क्यांच्या पुढे होता. गोदावरी नदीवरील ११ बंधाऱ्यांमध्ये ५५.४० टक्क्यांवर पोचला आहे. तेरणा, मांजरा, रेणा नदीवरील २४ बंधाऱ्यांमधील गत आठवड्यात ३०.८८ टक्क्यांवर असलेला उपयुक्त पाणीसाठा या आठवड्यात घटून २६.१२ टक्क्यांवर आला असल्याची माहिती जलसंपदा विभागाच्या सूत्रांनी दिली. अर्धा पावसाळा संपल्यानंतरही प्रकल्पांच्या पाणीसाठ्यात न झालेली वाढ चिंता वाढविणारी आहे.

### लघु प्रकल्पांची संख्या व उपयुक्त पाण्याचा टक्का

| जिल्हा | प्रकल्पांची संख्या | उपयुक्त पाण्याचा टक्का |
|---|---|---|
| औरंगाबाद | ९३ | २२ |
| जालना | ५७ | ०५ |
| बीड | १२६ | ०५ |
| लातूर | १३२ | १२ |
| उस्मानाबाद | २०१ | १९ |
| नांदेड | ८८ | ४६ |
| परभणी | २२ | २७ |
| हिंगोली | २६ | ९४ |